शिक्षण संचालनालयाची पुनर्रचना करुन शिक्षण संचालनालय (योजना) कार्यालयाची निर्मिती तसेच जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयाची निर्मिती-

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्र. आढावा २०२२/प्र.क्र.४७/प्रशा-५**

चौथा मजला, मंत्रालय विस्तार इमारत,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई

दिनांक : २२ जून, २०२२

वाचा -

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.२.६.२०१५
२. शा.शि.व क्री.वि., शासन निर्णय क्र.शापोआ-२०२०/प्र.क्र.१५६/एसडी-३, दि.६.७.२०२१
३. शा.शि.व क्री.वि., शासन निर्णय क्र.आढावा-२०१९/प्र.क्र.७४/१९, दि.४.४.२०२२
४. आयुक्त शिक्षण कार्यालयाचे पत्र क्र.आस्था-अ/टे.१०६/अल्पसं./८१३२/ २०२२/२९१०, दिनांक २३.५.२०२२

**प्रस्तावना :-**

शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्त्याखालील अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयाचे नामांतर शिक्षण संचालनालय (योजना) असे करुन प्राथमिक शिक्षण संचालनालय तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय यांचेकडील योजना शिक्षण संचालनालय (योजना) यांचेकडे वर्ग करण्याची तसेच सर्व योजना जिल्हास्तरावर राबविण्याकरीता शिक्षणाधिकारी (योजना) यांचे कार्यालय निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २ जून, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रशासनावर कोणताही विपरीत परिणाम न होता, विभागामध्ये एकूण उपलब्ध कर्मचा-यांचे समायोजन करण्याचे संपूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. विभागाच्या ज्या संवर्गाच्या बाबतीत कामांची आवश्यकता कमी झाली आहे, अशा संवर्गातील पदांची विभागातील तीच वेतनश्रेणी असलेल्या दुस-या संवर्गात आवश्यकतेनुसार, विभागांतर्गत एकूण पदसंख्येच्या मर्यादेतच पदे स्थानांतरित करण्याची प्रशासकीय विभागास मुभा दिली आहे. त्याअनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्त्याखालील अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयाचे नामांतर शिक्षण संचालनालय (योजना) असे करण्यात येत आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालय तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडील योजना

शिक्षण संचालनालय (योजना) यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. शिक्षण संचालनालय (योजना) यांचेकडे अन्य शिक्षण संचालनालयाकडून वर्ग करण्यात येत असलेल्या योजना **सहपत्र-अ** येथे दर्शविण्यात आले आहेत. सदर योजना वर्ग केल्यानंतर प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील कामकाज **सहपत्र-ब** येथे नमूद केल्यानुसार राहील. तसेच, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाकडील कामकाज **सहपत्र-क** येथे नमूद केल्यानुसार राहील.

२. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या सहपत्र-अ येथे नमूद केलेल्या योजनेशी संबंधित सर्व अभिलेख व संबंधित सर्व लेखाशीर्षे, प्राथमिक शिक्षण संचालनालय आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय यांनी संचालनालय योजना यांचेकडे तातडीने वर्ग करण्याची कार्यवाही करावी. तसेच सहपत्र-अ येथे नमूद केलेल्या सर्व योजना ह्या जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी योजना यांचे कार्यालयाकडून हाताळण्यात येतील. तसेच दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे ३० जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) कार्यालयाचे कामकाज जे संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले होते, ते सर्व कामकाज शिक्षणाधिकारी योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत.

शासन निर्णय दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) कार्यालयाच्या जागेचा ताबा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे देण्यात आला होता. आत्ता, शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) कार्यालयाच्या जागेचा ताबा शिक्षणाधिकारी (योजना) यांचेकडे वर्ग करण्याची कार्यवाही करावी. जिल्हास्तरावर ज्या ३० जिल्ह्यांमध्ये शिक्षणाधिकारी निरंतर कार्यालय यापूर्वी अस्तित्त्वात होते, अशा ३० जिल्ह्यांमध्ये शिक्षणाधिकारी निरंतर कार्यालयाचे नामांतर शिक्षणाधिकारी (योजना) असे करण्यात येईल. सदर ३० जिल्ह्यांमध्ये शिक्षणाधिकारी प्राथमिक अथवा शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी सहपत्र-अ येथे नमूद केलेल्या योजनेसंबंधीचे सर्व अभिलेख शिक्षणाधिकारी योजना यांचेकडे तातडीने वर्ग करावे. सदर योजना वर्ग करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

३. वाशिम, हिंगोली, गोंदिया, नंदुरबार व पालघर येथील जिल्हा परिषद इमारतीमध्ये शिक्षणाधिकारी योजना कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी. त्यासंदर्भातील पाठपुरावा संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी करावे. सदर ५ जिल्ह्यामध्ये कार्यालयीन जागेची व्यवस्था होईपर्यंत योजनेचे कामकाज प्रचलित पध्दतीप्रमाणे सुरु राहील. सदर ५ जिल्ह्यामध्ये कार्यालयास जागा प्राप्त झाल्यानंतर व शिक्षणाधिकारी योजना कार्यालयासाठी वर्ग करण्यात आलेल्या गट अ व गट ब पदावरील अधिका-यांच्या नियुक्तीनंतर, विद्यार्थी लाभाशी संबंधित योजना ह्या शिक्षणाधिकारी प्राथमिक व शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी तातडीने वर्ग करण्याची कार्यवाही करावी.

४. प्राथमिक शिक्षण संचालनालय तसेच माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या योजना शिक्षण संचालनालय (योजना) यांचेकडे वर्ग करण्यात येत असल्याने, दोन्ही संचालनालयातील काही पदे तसेच अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील पदे संचालनालय (योजना) यांचे कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. त्यानुसार शिक्षण संचालनालय (योजना) यांचे कार्यालयासाठी पुढीलप्रमाणे पदे मंजूर करण्यात येत आहेत

<u>शिक्षण संचालनालय (योजना)</u>

| अ. क्र. | पदाचे नाव | गट | वेतनश्रेणी | पद स्थिती | पद संख्या | समान वेतन श्रेणीतील पद उपलब्ध करुन दिलेली माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण संचालक | अ | एस २९ : १३११००-२१६६०० | अस्थायी | १ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील शिक्षण संचालक पदनामाचे १ पद संचालनालय योजना या कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| २. | शिक्षण उपसंचालक | अ | एस २३ : ६७७००-२०८७०० | अस्थायी | १ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील उपसंचालकाचे १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| ३. | सहायक शिक्षण उपसंचालक | अ | एस २० : ५६१००-१७७५०० | अस्थायी | १ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील सहायक संचालक पदनामाचे शिक्षणाधिकारी संवर्गातील १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| ४. | उप शिक्षणाधिकारी (योजना) | ब | एस १७ : ४७६००-१५११०० | स्थायी | २ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील समान वेतनश्रेणीतील समाज शिक्षण अधिकारी पदनामाची उपशिक्षणाधिकारी संवर्गातील ३ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| | | | | अस्थायी | १ | |
| | | | | एकूण | ३ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | अधिक्षक मशिसे | ब | एस १७ : ४७६००-१५११०० | अस्थायी | १ | प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिक्षक मशिसे पदनामाची ५ पदे मंजूर असून, त्यापैकी १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| ६. | लेखाधिकारी | ब | एस १६ : ४४९००-१४२४०० | अस्थायी | १ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील लेखाधिकारी पदनामाचे १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| ७. | स्वीय सहायक | क | एस १६ : ४४९००-१४२४०० | अस्थायी | १ | माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील स्वीय सहायक लघुलेखक हे १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| ८. | उच्चश्रेणी लघुलेखक | क | एस १५ : ४१८००-१३२३०० | अस्थायी | १ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील उच्चश्रेणी लघुलेखकाचे १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| ९. | सहायक योजना अधिकारी | क | एस १५ : ४१८००-१३२३०० | अस्थायी | ३ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील समान वेतनश्रेणीतील कार्यक्रम सहायक हे १ पद व सहायक शिक्षण उपनिरीक्षकाची २ पदे अशी एकूण ३ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| १०. | निम्नश्रेणी लघुलेखक | क | एस १४ : ३८६००-१२२८०० | अस्थायी | १ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील लघुलेखक निम्नश्रेणीच्या ३ पदांपैकी १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११. | मुख्य लिपिक | क | एस १३ : ३५४००-११२४०० | स्थायी | २ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयाच्या आस्थापने-वर मुख्य लिपिकांची ५ पदे मंजूर होती, त्यापैकी १ पद दि.८/९/२०२० अन्वये पालघर येथे वर्ग करण्यात आल्याने, उर्वरित ४ पदे तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालयातील मुख्य लिपिकाचे १ अस्थायी पद अशी मुख्य लिपिकांची एकूण ५ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| | | | | अस्थायी | ३ | |
| | | | | एकूण | ५ | |
| १२. | वरिष्ठ लिपिक | क | एस ८ : २५५००-८११०० | अस्थायी | ११ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवर वरिष्ठ लिपिकांची १० पदे मंजूर होती, त्यापैकी ३ पदे दि.८/९/२०२० अन्वये पालघर येथे वर्ग करण्यात आली आहेत. अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील उर्वरित ७ पदे तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालयातील वरिष्ठ लिपिकांची ३ पदे व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातील वरिष्ठ लिपिकाचे १ पद अशी एकूण ११ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| १३. | लिपिक-टंकलेखक | क | एस-६ : १९९००-६३२०० | अस्थायी | ११ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयाच्या आस्थापने-वर कनिष्ठ लिपिकांची ७ पदे मंजूर होती, त्यापैकी १ पद दि.८/९/२०२० अन्वये पालघर येथे वर्ग करण्यात आल्याने, उर्वरित ६ पदे तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालयातील ५ पदे व |
| | | | | स्थायी | ०३ | |
| | | | | एकूण | १४ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातील कनिष्ठ लिपिकांची ३ स्थायी पदे अशी एकूण १४ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| १४. | वाहन चालक | क | एस-६ : १९९००-६३२०० | अस्थायी | २ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील वाहन चालकांची २ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| १५. | नाईक | ड | एस-३ : १६६००-५२४०० | अस्थायी | १ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील नाईक चे १ पद संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| १६. | शिपाई | ड | एस-१ : १५०००-४७६०० | अस्थायी | ६ | अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयातील ६ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| १७. | सफाईगार | ड | एस-१ : १५०००-४७६०० | अस्थायी | २ | प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील शिपाई पदनामाची २ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करुन ती सफाईगार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहेत. |
| १८. | सुरक्षा रक्षक | ड | एस-१ : १५०००-४७६०० | अस्थायी | २ | माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील शिपाई पदनामाची २ पदे संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करुन ती सुरक्षा रक्षक म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहेत. |
| | **एकूण पदे** | | | | ५७ | |

५. वरील पदांव्यतिरिक्त प्राथमिक शिक्षण संचालनालयामध्ये स्थापन करण्यात आलेला शालेय पोषण आहार कक्ष व त्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दि.६ जुलै, २०२१ अन्वये निर्माण केलेली २२ पदे देखील संचालनालय योजना यांचेकडे वर्ग करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनस्तर |
|---|---|---|---|
| १ | राज्य समन्वय अधिकारी (शापोआ) | १ | एस २५ |
| २ | अधिक्षक (शापोआ) | ३ | एस १४ |
| ३ | लेखाधिकारी | १ | एस १६ |
| ४ | सहायक लेखाधिकारी | १ | एस १५ |
| ५ | लेखापाल | १ | एस १३ |
| ६ | सपोर्ट स्टाफ (कंत्राटी पध्दतीने) | ५ | एकत्रित वेतन रु.१००००/- |
| ७ | डेटा एंट्री ऑपरेटर (कंत्राटी पध्दतीने) | १० | एकत्रित वेतन रु.१५,९००/- |
| | एकूण | २२ | |

६. शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयासाठी खालीलप्रमाणे पदे मंजूर करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | गट | वेतनश्रेणी | स्थायी / अस्थायी | पद संख्या | समान वेतन श्रेणीतील पद उपलब्ध करुन दिलेली माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षणाधिकारी योजना | अ | एस २० : ५६१००-१७७५०० | अस्थायी | ३५ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी निरंतर कार्यालयातील शिक्षणाधिकारी निरंतर पदनामाची ३० पदे + व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई येथील व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी पदनामाचे १ पद विभागीय व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी (मूळ कार्यालय), लातूर, येथील व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी पदनामाचे १ पद व राज्य आंग्लभाषा अध्यापक संस्था, औरंगाबाद येथील प्राध्यापक पदनामाची ३ पदे अशी एकूण ५ पदे (सर्व पदे अस्थायी) एकूणात शिक्षणाधिका-यांची ३५ पदे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| २. | उप शिक्षणाधिकारी (योजना) | ब | एस १७ : ४७६००-१५११०० | अस्थायी | ३५ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी निरंतर कार्यालयातील उपशिक्षणाधिकारी पदनामाची **३२ पदे** (अस्थायी) + सहाय्यक व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी, विभागीय कार्यालये नाशिक, औरंगाबाद, व नागपूर येथील १ पद अशी एकूण **३ पदे** (सध्याचे पदनाम व कार्यालय- प्राध्यापक, विभागीय विद्या प्राधिकरण, मुंबई) (सर्व पदे अस्थायी) एकूणात **३५ पदे** शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| ३. | सहायक योजना अधिकारी | क | एस १५ : ४१८००-१३२३०० | अस्थायी | ७० | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) आस्थापनेवर सहायक प्रकल्प अधिकारी पदनामाची २३९ पदे मंजूर होती, त्यापैकी शा.नि. दि.३१/७/१७ नुसार १०९ पदे विषय सहायक म्हणून वर्ग करण्यात आली आहेत. उर्वरित १३० पदांपैकी ७० **(अस्थायी) पदांचे सहायक योजना अधिकारी पदामध्ये रुपांतर** करुन शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | निम्नश्रेणी लघुलेखक | क | एस १४ : ३८६००-१२२८०० | स्थायी<br>अस्थायी<br>एकूण | ५<br>३०<br>**३५** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) आस्थापनेवर लघुलेखक व लघुलेखक निम्नश्रेणी पदनामाची २९ पदे (५ स्थायी व २४ अस्थायी) + प्राथमिक शिक्षण संचालनालयातील संशोधन सहायकांची **२ पदे** + राज्य आंग्लभाषा अध्यापक संस्था, औरंगाबाद येथील लघुलेखक निम्नश्रेणीची **२ पदे** + राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर येथील लघुलेखकाचे **१ पद** + व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई येथील ग्रंथपालाचे **१ पद** अशी समकक्ष वेतनश्रेणीतील एकूण **६ पदे** मिळून **३५ निम्नश्रेणी लघुलेखकांची पदे** शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| ५. | वरिष्ठ लिपिक | क | एस ८ : २५५००-८११०० | स्थायी<br>अस्थायी<br>एकूण | ७<br>२८<br>**३५** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) आस्थापनेवर वरिष्ठ लिपिक पदनामाची ५२ पदे (स्थायी ७ व अस्थायी ४५) त्यापैकी **३५ वरिष्ठ लिपिक** पदे (स्थायी ७ व अस्थायी २८) शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| ६. | लिपिक-टंकलेखक | क | एस-६ : १९९००-६३२०० | स्थायी | २ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) आस्थापने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वर कनिष्ठ लिपिक पदनामाची ७१ पदे (स्थायी २ व अस्थायी ६९) मंजूर होती, त्यापैकी शा.नि., दि.२७/११/२०१७ अन्वये २ पदे पालघर येथे वर्ग करण्यात आली आहेत. उर्वरित ६९ पदे (स्थायी २ व अस्थायी ६७ पदे) शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. याव्यतिरिक्त व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, लातूर येथील १ **पद** मिळून एकूण **७० लिपिक-टंकलेखक** पदे शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| | | | | अस्थायी | ६८ | |
| | | | | एकूण | ७० | |
| ७. | वाहनचालक | क | एस-६ : १९९००-६३२०० | स्थायी | ०६ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) आस्थापनेवर वाहन चालक पदनामाची ३२ पदे (स्थायी ६ व अस्थायी २६) मंजूर होती, सदर **३२ पदे** तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमधील वाहनचालकाचे **१ पद** + राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर येथील वाहन चालकाचे **१ पद** + शिक्षणाधिकारी प्राथमिक, यवतमाळ येथील वाहन चालकाचे १ **पद** अशी एकूण **३५ वाहन चालक पदे** शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. |
| | | | | अस्थायी | २९ | |
| | | | | एकूण | ३५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | शिपाई | ड | एस-१ : १५०००-४७६०० | अस्थायी | ३५ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आस्थापनेवर वर्ग करण्यात आलेली शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) आस्थापनेवर शिपाई पदनामाची ६३ पदे (सर्व अस्थायी) मंजूर होती, त्यापैकी शा.नि. दि.२७/११/२०१७ नुसार १ पद पालघर येथे वर्ग करण्यात आले आहे व शा.नि. दि.१४/१/२०२२ नुसार २७ पदे निरसित करण्यात आली आहेत. शिल्लक राहिलेली **३५ अस्थायी शिपाई पदे** शिक्षणाधिकारी योजना कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहे. |
| | **एकूण** | | | | ३५० | |

७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडील योजना शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयाकडे वर्ग होत असल्यामुळे, संबंधित योजनेचे काम पाहणारे कर्मचारी यांच्या सेवा शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयाकडे वर्ग करण्याबाबत संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

८. प्राथमिक शिक्षण संचालनालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय व अल्पसंख्यांक प्रौढ शिक्षण संचालनालय मधून जी पदे संचालनालय योजना कार्यालयात स्थानांतरित करण्यात आली आहेत, ती पदे त्या पदांवर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेसह वर्ग करण्यात येत आहेत. नवनिर्मित संचालनालय योजना कार्यालयामध्ये रिक्त असलेल्या गट अ ते गट ड पदांवर तातुपरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याचे अथवा अतिरिक्त कार्यभार देण्याचे अधिकार आयुक्त शिक्षण यांना प्रदान करण्यात येत आहेत. नवनिर्मित संचालनालयातील रिक्त असलेल्या अथवा रिक्त होणा-या गट-अ व गट-ब पदावर नियमित नियुक्ती देण्याबाबतचे आदेश शासनाकडून यथावकाश निर्गमित करण्यात येतील. तसेच जिल्हास्तरावरील शिक्षणाधिकारी योजना कार्यालयातील गट अ व गट ब पदावर अधिका-यांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती अथवा अतिरिक्त कार्यभार देण्याचे अधिकारदेखिल आयुक्त शिक्षण यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदर पदावर नियमित नियुक्तीचे आदेश शासनाकडून यथावकाश निर्गमित करण्यात येतील. तसेच शिक्षणाधिकारी

(योजना) कार्यालयाचे कामकाज तातडीने सुरु व्हावे म्हणून, सदर कार्यालयातील गट क व गट ड च्या पदावर तात्पुरती नियुक्ती अथवा अतिरिक्त कार्यभार देण्याचे अधिकार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देण्यात येत आहेत. दरम्यान, शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयातील गट क व गट ड पदावर नियमित नियुक्ती देण्याबाबत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रचलित नियम व विहित कार्यपध्दतीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

९. संचालनालय योजना तसेच शिक्षणाधिकारी योजना सुनियोजित पध्दतीने तातडीने कार्यान्वित करण्यासाठी आयुक्त शिक्षण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आयुक्त शिक्षण यांनी दिलेल्या सूचनेनुसार कालबध्द पध्दतीने कार्यवाही करण्यात यावी.

१०. वित्त विभाग, शासन निर्णय दि.२ जून, २०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन समकक्ष वेतनश्रेणीतील पदे स्थलांतरित करण्यात आलेली आहेत. या शासन निर्णयाव्दारे कोणतीही नवीन पदे निर्माण करण्यात आलेली नाहीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०६२३१५४७३७५०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2022.06.24 17:39:36 +05'30'

( टि. वा. करपते )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत -सहपत्र अ, ब, क

प्रति,

१. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४. शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. शिक्षण संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१०.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) शिक्षण
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

१४.निवडनस्ती/प्रशा-५.

प्रत माहितीसाठी,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, ग्रामविकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.मा.विरोधी पक्षनेता यांचे खाजगी सचिव, विधान परिषद / विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१२.अप्पर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अप्पर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.अप्पर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.सचिव यांचे स्वीय सहायक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.सर्व सह सचिव / उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.उप सचिव, आपुक व व्यय-५, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सर्व अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.आढावा २०२२/प्र.क्र.४७/प्रशा-५,

दिनांक : २२ जून, २०२२ सोबतचे

**सहपत्र-अ**

| | **संचालनालय योजना यांचेकडील कामकाज** |
|---|---|
| **क्र.** | **योजनेचे नाव** |
| | **प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून वर्ग करण्यात येणा-या योजना** |
| १. | सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना |
| २. | प्राथमिक शाळेतील पुस्तक पेढी योजना |
| ३. | जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (मोफत गणवेश व साहित्य पुरवठा) |
| ४. | राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १०३ विकास गटातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके |
| ५. | राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १२० विकास गटातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या मोफत गणवेश व लेखनसाहित्य पुरवठा |
| ६. | इयत्ता पहिली ते चौथीमधील प्राथमिक शाळेत शिकणा-या मुलींना उपस्थितीभत्ता |
| ७. | शालेय पोषण आहार योजना |
| ८. | राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना |
| ९. | जिल्हा बालभवन योजना |
| | **माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडून वर्ग करण्यात येणा-या योजना** |
| १०. | इयत्ता दहावी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण |
| ११. | इयत्ता बारावी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण |
| १२. | ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु.एक लाखापेक्षा अधिक नाही, अशा इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना फी माफी |
| १३. | प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण |
| १४. | माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच शिक्षणशास्त्र पदविका विद्यालयातील अध्यापकांच्या व अध्यापक विद्यालयातील सर्व स्तरांवरील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण |
| १५. | स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती |
| १६. | माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत |
| १७. | आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन |
| १८. | अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / प्रतिपूर्ती |
| १९. | शिक्षणशास्त्र पदविका पाठ्यक्रमाकरिता मुलींना मोफत शिक्षण |
| २०. | विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी त्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलत |
| २१. | माध्यमिक पुस्तकपेढी योजना |
| २२. | राजमाता जिजाऊ सायकल वाटप योजना |
| २३. | राष्ट्रीय भारतीय सैनिक महाविद्यालय डेहराडून येथील सरकारी शिष्यवृत्त्या |
| २४. | माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या ग्रामीण भागातील हुशार प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती |
| २५. | माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती पूर्व माध्यमिक शाळा |
| २६. | माध्यमिक शिक्षण शिष्यवृत्त्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना सहाय्य |
| २७. | माध्यमिक शिक्षण शिष्यवृत्त्या महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने |

| | |
|---|---|
| २८. | कनिष्ठ महाविद्यालयातील खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| २९. | आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| ३०. | भाषा विकास संस्कृत शिक्षण माध्यमिक शाळांमध्ये भारत सरकारची शिष्यवृत्ती |
| ३१. | माध्यमिक शाळेतील मुलींना राष्ट्रीय योजनेतून रु.३०००/- प्रोत्साहन भत्ता |
| ३२. | राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना |
| ३३. | दिव्यांग कल्याण शिष्यवृत्ती योजना |
| | **अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालयाकडील योजना** |
| ३४. | अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना |
| ३५. | अल्पसंख्यांक समाजाच्या संस्था / शाळांसाठी पायाभूत विकास योजना |
| ३६. | मदरशांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे योजना |
| ३७. | मराठी भाषा फाऊंडेशन योजना |
| | **केंद्र शासनाच्या नवीन योजना** |
| ३८. | बेगम हजरत महल शिष्यवृत्ती योजना |
| ३९. | नव भारत साक्षरता कार्यक्रम |

वरील सर्व योजनांचे कामकाज पाहणे, सदर योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना पोहोचविणे, सदर योजनांशी संबंधित सर्व माहिती ठेऊन त्याचे संस्करण करणे, सदर योजनांशी संबंधित विधानमंडळ कामकाज हाताळणे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.आढावा २०२२/प्र.क्र.४७/प्रशा-५,
दिनांक : २२ जून, २०२२ सोबतचे **सहपत्र-ब**

| प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील कामकाज | |
|---|---|
| **क्र.** | **कामकाजाचे स्वरुप** |
| १. | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी |
| २. | महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ ची अंमलबजावणी |
| ३. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षणाशी संबंधित सर्व कामकाज हाताळणे |
| ४. | बृहत आराखड्यानुसार जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये सर्व माध्यमाच्या नवीन प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबतचे कामकाज |
| ५. | जिल्हा परिषद शाळांमधील संच मान्यता, शिक्षण सेवक नियुक्ती, शिक्षक भरती प्रक्रिया याबाबतचे कामकाज |
| ६. | जिल्हा परिषदांचे अनुदान निर्धारण, वितरण व अनुषंगिक कामकाज तसेच अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक, पुरवणी मागणी सादर करणे |
| ७. | जिल्हा परिषदांमधील शिक्षकांचे निवृत्तीवेतन व नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन विषयक कामकाज हाताळणे |
| ८. | जिल्हा परिषदेमधील शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या आस्थापनाविषयक बाबीबाबत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित कामकाज पाहणे व त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारी इ. |
| ९. | प्राथमिक शाळांना भेटी देणे, तपासणी करणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होण्याकरीता उपाययोजना करणे |
| १०. | संचालनालयाकडील कामकाजासंबंधित विनियोजन लेखे, लेखा आक्षेप इत्यादी |
| ११. | महानगरपालिका, नगरपालिका व कटकमंडळे शाळा प्रशासन (संच मान्यता, शिक्षण सेवक नियुक्ती, शिक्षक भरती प्रक्रिया इ.) बाबी हाताळणे |
| १२. | महानगरपालिका, नगरपालिका व कटकमंडळे शाळांचे अनुदान निर्धारण, वितरण व अनुषंगिक कामकाज तसेच अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक, पुरवणी मागणी सादर करणे |
| १३. | महानगरपालिका, नगरपालिका शाळांमधील शिक्षक व शिक्षण सेवक यांच्या आंतर जिल्हा बदलीची प्रकरणे हाताळणे |
| १४. | खाजगी प्राथमिक शाळा मान्यता देणे अथवा काढणे (सर्व मान्यता), तुकडी मान्यता, नैसर्गिक तुकडी वाढ, शाळांचे पुनरुज्जीवन इ.बाबतचे प्रस्ताव शासनास सादर करणे |
| १५. | खाजगी प्राथमिक शाळेतील विशेष पटपडताळणी व संचमान्यता विषयक कामकाज हाताळणे |
| १६. | खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षके शिक्षकेतर कर्मचा-यांची वैयक्तिक मान्यता व त्याअनुषंगाने हाताळावयाचे कामकाज, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन |
| १७. | सरल प्रणाली, शालार्थ प्रणाली, युडायस प्रणाली व त्यासंबंधित विश्लेषणात्मक माहिती तयार करणे |
| १८. | खाजगी प्राथमिक शाळा वेतन वे वेतनेतर अनुदान विषयक कामकाज हाताळणे |
| १९. | खाजगी प्राथमिक शाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे भविष्यनिर्वाह निधी, निवृत्तीवेतन व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन विषयक कामकाज हाताळणे |
| २०. | शासन मान्यतेशिवाय सुरु असलेल्या अनधिकृत प्राथमिक शाळांवर कार्यवाही करणे |
| २१. | प्राथमिक शाळेवर प्रशासक नियुक्तीसंबंधी कामे, सुनावणी घेणे इत्यादी |
| २२. | कार्यक्रम अंदाजपत्रक (१), आदिवासी विकास कार्यक्रम अंदाजपत्रक, वित्त आयोग संबंधित कामकाज |
| २३. | सांख्यिकी प्रकाशन, आर्थिक पाहणी प्रकाशन, जीवन शिक्षण मासिक व किशोर मासिक अनुदान वितरण |
| २४. | कोरोनासारख्या आपत्ती काळात शिक्षकांची व विद्यार्थ्यांची सुरक्षा व त्यांची उपस्थिती याबाबतचे कामकाज, शाळा सुट्टया परिपत्रक काढणे |
| २५. | संचालनालयाशी संबंधित कामकाजाचे विधिमंडळ कामकाज, विधिमंडळाच्या विविध समित्यांचे कामकाज, न्यायालयीन कामकाज हाताळणे |
| २६. | शासनाने नेमून दिलेली कामे |

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.आढावा २०२२/प्र.क्र.४७/प्रशा-५, दिनांक : २२ जून, २०२२ सोबतचे सहपत्र-क

| माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडील कामकाज | |
|---|---|
| क्र. | कामकाजाचे स्वरुप |
| १. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाशी संबंधित सर्व कामकाज हाताळणे |
| २. | माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाशी संबंधित बृहत आराखडा, शाळा स्थलांतर व हस्तांतरण संबंधित कामकाज |
| ३. | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा परवानगी प्रस्ताव, दर्जावाढ, वर्ग जोडणे, नावात बदल, प्रस्तावास मुदतवाढ विषयक कामकाज |
| ४. | माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा अथवा कनिष्ठ महाविद्यालय अतिरिक्त शाखा मान्यता, अतिरिक्त तुकडी - मूल्यांकन व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे |
| ५. | माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय यांना वर्ग जोडणी किंवा वर्ग स्वतंत्र करणे इ.बाबी विषयक कामकाज |
| ६. | माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची पटपडताळणी, माध्यमिक शाळांची संचमान्यता, वाढीव पदे, अधिसंख्य पदे व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन |
| ७. | माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतन, थकीत वेतन, जुनी निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन योजना व त्याअनुषंगिक तक्रारींबाबत पत्रव्यवहार |
| ८. | माध्यमिक शाळांचे अनुदान निर्धारण, वेतनेतर अनुदान- अर्थसंकल्प, वितरण व विनियोजन लेखे, खर्च ताळमेळ तसेच शालार्थ प्रणाली विषयक कामकाज |
| ९. | माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा संस्थांचे वाद, तक्रारी, प्रशासक नियुक्ती |
| १०. | शासन मान्यतेशिवाय सुरु असलेल्या अनधिकृत माध्यमिक शाळांवर कार्यवाही करणे, माध्यमिक शाळा बंद करणे इ.बाबतचे कामकाज |
| ११. | खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील अपंग अनुशेष व सहायक तंत्रज्ञान साहित्य पुरवठा |
| १२. | इयत्ता ११वी ऑनलाईन प्रवेश परीक्षा संबंधी कामकाज |
| १३. | कन्या शाळेचे सह शिक्षण स्वरुपात बदल करणे |
| १४. | शाळा सुट्ट्यांबाबत पत्रव्यवहार |
| १५. | शुल्क विनियमन अधिनियम व त्याअंतर्गत नियमांची अंमलबजावणी, तक्रारी इ.बाबी |
| १६. | शासकीय विद्यानिकेतन संबंधी कामकाज |
| १७. | नवोदय विद्यालय, सैनिकी शाळा, केंद्रीय शाळा व रात्रशाळा व्यवस्थापनाच्या शाळा विषयक कामकाज |
| १८. | खाजगी शिकवणी - धोरण, अंमलबजावणी व तक्रारींचे निवारण इ.बाबी विषयक कामकाज |
| १९. | राष्ट्रीय व राज्य शिक्षक पुरस्कार |
| २०. | अर्धवेळ ग्रंथपाल, अर्धवेळ शिक्षक, रात्रशाळा शिक्षक यांच्याशी संबंधित धोरण व त्याबाबत पत्रव्यवहार |
| २१. | कार्यक्रम अंदाजपत्रक (२), विनियोजने लेखे खर्च ताळमेळ |
| २२. | शैक्षणिक चित्रपट शाळांमध्ये दाखविण्यासाठी परवानगी देणे |
| २३. | महाराष्ट्राची आर्थिक पाहणी |
| २४. | आमदार /खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत तांत्रिक मान्यता |
| २५. | संचालनालयाशी संबंधित कामकाजाचे विधिमंडळ कामकाज हाताळणे |
| २६. | शासनाने नेमून दिलेली कामे |